फेब्रुवारी २००६

# लॉटरी पध्दतीने ऑडिटरची नेमणूक

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६१ ह्या सहकारी कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यातील १ लाख ७५ हजारांच्या वर नोंदणीकृत सहाकरी संस्थाचे लेखापरिक्षण करण्याची कायदेशीर जबाबदारी कलम ८१ नुसार राज्याच्या सहकार आयुक्तांची आहे.**राज्याचे सहकार आयुक्त म्हणजेच निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य होय.**हे निबंधक वरील सहकारी संस्थाचे लेखापरिक्षण करण्यासाठी कायद्याला अधिन राहून लेखापरिक्षण करण्यासाठी कायद्याला अधिन राहून लेखापरिक्षणाची पध्दत, कालमर्यादा,ठरवू शकतात. ज्या ज्या सहकारी संस्थाना राज्यशासन, किंवा शासकीय उपक्रम यांचेकडून वेळोवेळी हमीसह वित्त सहाय्य देण्यात आलेले नाही,अशा संस्थाचे लेखापरिक्षण प्रत्येक सहाकारी वर्षात निदान एकदा निबंधकाने नेमलेल्या लेखापरिक्षक नामिकेतील लेखापरिक्षकांकडून किंवा '' **इन्स्टिट्युट ऑफ द अकांऊटस् ऑफ इंडिया**'' या संस्थेंने दिलेले सहकार लेखा परिक्षा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या एकाद्या सनदी लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षण करण्याचे किंवा करुन घेण्याचे जबाबदारी व कर्तव्य निबंधकाचे आहे.

लेखा परिक्षण कोणी,कसे, केव्हा करावयाचे व त्यासाठी किती शुल्क कुठल्या कारणास्तव काय पध्दत अवलंबून आकारावयाचे याची सुध्दा सहकार कायद्यामध्ये पध्दती निश्चित केलेली आहे. सहकार खात्याचे ऑडिटर अशी सर्वसाधारणपणे ऑडिटरची ऑफिसिअल गॅझेटमध्ये नोंद करुन प्रसिध्द करण्याची जबाबदारी निबंधकाची आहे. **ऑडिट,रिऑडिट, कंटीन्युअस ऑडिट,किंवा कॉन्करन्स ऑडिट आणि टेस्ट किंवा सुपर ऑडीट अशा ऑडिट करण्याचा पध्दती सहकार कायद्यात अंर्तभूत आहे**. तीन वर्षातुन एकदा सर्टिफाईड ऑडिटर्सची नावे निबंधकाने ऑफिसिअल गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्याची जबाबदारी निबंधकाची आहे सहकार कायद्याचे कलम ८१ नुसार ऑडीट करणे, कलम ८२ नुसार रेक्टीफीकेशन करणे व रेक्टीफिकेशन नंतर कलम ८३ नुसार निबंधकाने आवश्यकता भासल्यास चौकशी करणे किवा कलम १५४ नुसार शासन आणि निबंधक यांनी स्वत:हुन चौकशी करणे तसेच नियम ६९ नुसार ऑडीटरची नेमणूक करणे व नियम ७०नुसार फेडरल सोसायटीकडून अभिप्राय कलम ८३ च्या संदर्भात मागणे हे निबंधकास कायद्याने बंधनकारक आहे.

सहकारी कायद्याच्या व्यापक भूमिकेमुळे सहकारी संस्थेचे ऑडीट या संकल्पनेला निबंधक आणि शासन त्या त्या वेळेस आपल्या अधिकाराचा वापर करुन वेळोवेळी वेगळी भूमिका स्विकारत असते.एकेकाळी सहकार खात्यामध्ये काम करणारे शासकीय अधिकारी हे सहकारी संस्थाचे ऑडीट योग्य रितीनेच करतात, असा अनुभव राज्यभर होता. तद्नंतर निबंधकानी या भुमिकेशी असहमती दर्शविली व ऑडिटर नेमणूकीची पध्दत उपलब्ध अधिकाराच्या माध्यमातुन बदलून टाकली. शासनाने मात्र या कृतीस विरोध दर्शविलेला होता. पंरतु शासनाचा विरोध

कालातंराने निबंधकाच्या विचारांशी सहमत झाला. आणि शासनाच्या अधिकाऱ्यांच्या मार्फत होणारे ऑडीट व शासकीय अधिकाऱ्यांच्या शिवाय म्हणजेच इतर सर्टिफाईड ऑडिटरकडून ऑडिट करुन देण्याचे आदेश निबंधकानी अखेर शासनाच्या मंजुरीने काढले.सहकारी संस्थावर ऑडिटर नेमण्याचा पध्दतीच्या बदलास काही दिवस राज्यातील सहकार खात्यातील अधिकाऱ्यांनी दबक्या आवाजात विरोध नोंदविला.**परंतु सहकारी संस्थाचे ऑडिट हि या राज्यातील सहकारी संस्थावर खुले आम भरदिवसा राजरोसपणे दरोडा टाकून खंडणी वसुल करण्याची मोहिम असल्याची परिस्थिती गेली अनेक वर्ष चालू असल्याची प्रचिती सर्वश्रुत आहे.**

एकाद्या सहकारी संस्थेने ऑडीटचे काम मिळवण्यासाठी पुणे येथील सहकार आयुक्तांचे कार्यालय व माननीय सहकार आयुक्तांचे कार्यालय व मानानीय सहकार आयुक्तांना अशा कामात त्वरीत तप्तरता दाखविणारे संबंधित वरिष्ठ अधिकारी, तसेच डिव्हिजनल जॉंईट रजिस्ट्रार यांची ऑडीटर नियुक्तीची अवलंबविलेली पध्दत, महाराष्ट्र राज्यासारखा प्रगत राज्याला मान शरमेने खाली घालणारी बाब ठरल्याचे सर्वस्तरावर ज्ञात आहे. या सर्व प्रकाराने ऑडीटर नेमणे, रेक्टीफिकेशन रिपोर्ट नंतर चौकशी करणे व चौकशी नंतर पुढील कारवाई सबंधीतावर करणे, याबाबत मोठ्या प्रमाणात भेदभाव केल्याचेच निदर्शनास येते.परंतु अशा प्रकारणामध्ये जाब कुणाकडे मागावयाचा याचे उत्तर भले-भले देवू शकले नाहीत, हे कटू सत्य आहे. कारण जाब विचाणाऱ्याला केव्हा अडचणीत सापडवून महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष दुसऱ्या विषयाकडे क्रेंद्रीत केले जाईल हे सांगता येणार नाही. जर **ऑडिटच्या संदर्भातील ''स्कॅम'' बाहेर काढण्यासाठी कागोदपत्रे पुरावे उपलब्ध होऊ शकले नाही तरीही, ४० टक्के पर्यंत ऑडिटचे काम मिळविण्यासाठी रक्कम कोण,कोणाला, केव्हा व कशासाठी देतो याचे उत्तर राज्यातील सहकाराचे आदर्श व सहकाराची मूलतत्वे  सांगणाऱ्या व संभाळणाऱ्यांना चांगले माहित आहे.आणि मग ऑडिट मिळविणेसाठी संबंधितांना दिलेल्या ४० टक्के रकमेची वसुली सहकारी संस्थाचे ऑडिट करताना कशी करावयाची याचे चांगले ज्ञान प्राप्त केल्याशिवाय या फंदात कोण पडेल यावर विश्वास ठेवता येणार नाही. ऑडिटर नेमण्याचे अधिकार व पध्दत म्हणून बदलण्याची गरज आहे.**

राज्यातील **१ लाख ७५ हजारांच्या वर सहकारी संस्थाचे ऑडिट ज्या बिगर सरकारी अधिकाऱ्यांच्या मार्फत करण्यासाठी पध्दत स्विकारलेली आहे, ती लॉटरी पध्दतीनेच ऑडीटचे वाटप केले पाहिजे.** या शिवाय आता पर्याय राहिलेला नाही. आणि जर लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन ऑडीटर नेमण्याची पध्दत चालू करण्यासाठी मानसिकता स्विकारली, तर त्या अनुषंगाने कायदा, नियम,सरकार निश्चितपणे स्वत:हून या चांगल्या कामात पुढाकार घेईल, अशी प्रामाणीक इच्छा व आत्मविश्वास या अग्रलेखाव्दारे आम्ही प्रगट करीत आहोत.

**ऑडिट, रिऑडिट,कॉस्ट ऑडिट, टेस्ट ऑडिट,इन्कॉयरी,कंटिन्युअस ऑडिट, कॉन्करन्स ऑडिट, सुपर व्हिजन, सुपर ऑडिट इत्यादी सहकार कायद्यातील भारदस्त शब्द सहकारी संस्थाच्या कार्यकर्त्यांमध्ये भिती तयार करणारे रेडीमेड हत्यार निबंधक व शासनाकडे सहकार कायद्यातील ऑडीटच्या संदर्भातील**

**सर्व कलम व नियम यांचा वापर सातत्याने संबंधित यंत्रणेकडून सहकारी संस्था त्या संस्थाचे विश्वस्त यांचे बाबतीत व वाईट हेतू साध्य करण्यासाठी केला जात असल्यामुळे संस्था व सभासद यांचे आर्थिक व सामाजिक उत्थान १०० वर्षानंतरही झालेले नाही.** आणि ह्यासाठी आवाज उठविण्याचे काम कार्यकर्ते व लोकप्रतिनीधी करताना अभावानेच व कुमकुवतपणे दिसतात. ही शोकांतिका आहे.आणि म्हणून हेच दृष्टचक्र मोडून टाकण्याचे काम ''लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन'' ऑडीटरची नेमणूक करणे हा त्यातील एक भाग आहे.**एका सहकारी वर्षात ऑडिटच्या सध्याच्या कामकाजाचा पध्दतीमुळे किमान रुपये ५० कोटीची माया वाममार्गाने लुटण्याचे काम होते**.आणि अशा मिळालेल्या पैशांच्या भागीदारीत भले-भले सामील होतात. व त्याच पैशातून सत्ता व सत्तेतून मनुष्यबळ व मनुष्यबळाच्या माध्यमातुन रामराज्य संकल्पनेचे मोठे - मोठे खोटे व फसवे कार्यक्रम जनतेसमोर प्रदर्शित करुन व निवडणुकांना सामोरे जाऊन लोकांची फसवणूक केली जाते, हे आता हळूहळू सर्वसामान्यांच्या लक्षात येण्यास उशिरा का होईना सुरुवात झालेली आहे.आणि आमच्या दृष्टीने ही प्रेरणादायी घटनेची सुरुवात आहे.

सर्व होण्यासाठी सहकारात जनजागृती व वैचारीक क्रांती होणे गरजेचे आहे. सर्वसामान्य जनता दिवसेंदिवस जागृतपणे काम करीत असल्याचे चांगले दृष्य आपल्या सर्वांना रोज बघावयास मिळत आहे.**म्हणून सहकारी संस्थांच्या ऑडिटचे वाटप हे लॉटरी पध्दतीने घेण्यासाठी कार्यपध्दती या आर्थिक वर्षापासून निबंधकाने सुरु केली पाहिजे.** व या पध्दतीचा उहापोह **रेडीओ, दुरदर्शन, चॅनल्स, वर्तमानपत्रे** यांचेमार्फत जाहिर करावयास पाहिजे.आणि हे पारदर्शक काम करण्यासाठी कोणाचेही दुमत होण्याचे किवा शंका घेण्याचे किंवा सरकारच्या बजेटमध्ये तरतूद करण्याचे किंवा सामाजिक बांधलकीच्या विरोधातले काम बिलकुल नाही.याची नोंद निबंधकानी घेऊन **''ऑडिटचे कटू सत्य''** स्विकारले पाहिजे. असे जाहिर निवेदन या अग्रलेखाव्दारे करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**